# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ८८–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. रामू गुरुसिदाप्पा बिराजदार ,<br>रा. कोनबगी, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |

**विरुध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | विरुध्द पक्षकार |

<u>कोरम</u> :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

<u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>

(ग्राहक तक्रार निवारण मंच)

विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## <u>न्याय निर्णय</u>

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

रामू गुरुसिदाप्पा बिराजदार, रा. कोनबगी, ता. जत, जि. सांगली यांनी मंचाकडे महाराष्ट्र राष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित ( ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील नियम ६.१० नुसार परिशिष्ट अ मध्ये खालील मजकुरा संदर्भात दि. १६.४.२०१० रोजी तक्रार दाखल केली आहे.

तक्रारदार यांनी शेतीपंपास नवीन विद्युत पुरवठा मिळण्यासाठी वितरण कंपनीच्या संख उप विभागाकडे दि. ६.२.२०१० रोजी अर्ज करुन रु. ५०/- पोष्टाने पाठविले. तक्रारदार यांस चलन मिळाले नाही. त्यांच्या म्हणण्यानुसार सर्व्हीस कनेक्शन असलेस २० दिवसांत व वितरण वाहिनीचा विस्तार असलेस ३० दिवसांत चलन मिळणे हे कृती मानकांनुसार आवश्यक आहे. तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे क्ष फॉर्ममध्ये दि. ६.२.२०१० रोजी तक्रार दाखल केली आहे. अंतर्गत कक्षाने आदेश क्र. १६८८ दि. ११.२.२०१० रोजी पारित करुन कृती मानके साध्य करण्यात अपयश आल्यास ग्राहकास द्यावयाच्या नुकसान भरपाई बाबत निर्देशित केले आहे. तक्रारदार यांनी मंचासमोर अर्ज दिल्यापासून चलन मिळालेल्या तारखेपर्यंत झालेल्या विलंबापोटी कृती मानके विनियमातील तरतुदीप्रमाणे भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे. तक्रार प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत दाखल केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दिनांक १४.५.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदाराचा अर्ज दिनांक १०.२.२०१० रोजी मिळाल्याचे मान्य केले आहे व त्यांस दि. १०.५.२०१० रोजी चलन देण्यात आलेले आहे. तक्रारदाराचा चाचणी अहवाल प्राप्त झालेनंतर एस.ओ.पी.च्या मुदतीत वीज जोडणी देण्यात येईल असे म्हटले आहे.

प्रस्तुतची तक्रार दि. १८.५.२०१० रोजी मंचासमोर सुनावणीस घेतली असतां, तक्रारदार व प्रतिनिधी गैरहजर. वि.प.तर्फे श्री. दिवटे,सहाय्यक अभियंता, संख उप विभाग व श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महांकाळ विभाग उपस्थित. वि.प.तर्फे प्रतिपादन करण्यात आले की, सर्व्हीस कनेक्शन आहे, चलन दिल्याची पोच नाही, चलनाची प्रत नाही, ९ आठवडयांचा विलंबाबाबत कांही खुलासा नाही. त्यामुळे वि.प.चे म्हणण्यानुसार दि. १०.२.२०१० ला जरी अर्ज प्राप्त झाल्याचे गृहीत धरले तरी दि. १०.३.२०१० किंवा त्यापूर्वी चलन देणे आवश्यक होते. तसे झाले नाही, त्यामुळे दि. १०.३.२०१० ते दि. १०.५.२०१० असा ९ आठवड्यांचा विलंब झाला आहे. परंतु तक्रारदाराने रु. ५०/- मनीऑर्डरने दि. ६.२.२०१० ला व अर्ज त्याचदिवशी वि.प.कडे पाठविला. वि.प.तर्फे मा. आयोगाकडे विलंबापोटी नुकसान भरपाई बाबत नियम ११.२ खाली माफीसाठी कार्यवाही केल्याचे दिसत नाही. विलंबाबाबत इतर कांही संयुक्तिक कारण लेखी/ तोंडी वि.प.तर्फे सांगण्यात आले नाही. त्यामुळे कृती मानके विनियमातील तरतुदीचा भंग झाला असून ती पूर्ण करण्यात वि.प.स अपयश आले आहे. त्यामुळे दि. १०.३.२०१० ते दि. १०.५.२०१० याा ९ आठवड्यांचा विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/- या प्रमाणे रु. ९००/- इतकी भरपाई देण्यास वि.प. जबाबदार आहे. खालील आदेश -

## आदेश

१) तक्रारदाराची तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वि.प.च्या संखा उप विभागाने तक्रारदार यांस दि. १०.३.२०१० ते दि. १०.५.२०१० या ९ आठवडे विलंबाच्या कालावधीसाठी प्रति आठवडा रु. १००/- या प्रमाणे रु. ९००/- भरपाई द्यावी.

३) सदर रकमेचे २ बिलींग सायकलमधून समायोजन करावे व उर्वरित रक्कम तक्रारदार यांस रोखीने द्यावी.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )

अध्यक्ष

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :